शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष दहावे : अंक पंचवीस - सव्वीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१


''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार'' -
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित

**पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव**

• Accredited B++ with CGPA 2.76 by NAAC • ISO मानांकन 9001:2015 •

ता. तासगाव, जि. सांगली



# लोकसंस्कृतीची आविष्कार रूपे




शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष दहावे : अंक पंचवीस व सव्वीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२१

# लोकसंस्कृतीची आविष्कार रुपे

**• संपादक •**

प्रा.(डॉ.)शिवकुमार सोनाळकर

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

**• अतिथी संपादक •**

डॉ.मिलिंद हुजरे

प्राचार्य, पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि.सांगली

डॉ.तातोबा बदामे डॉ.शहाजी पाटील

**• कार्यकारी संपादक •**

डॉ.नीला जोशी

**• संपादक मंडळ •**

प्रा.(डॉ.)नंदकुमार मोरे डॉ.गोमटेश्वर पाटील डॉ. तातोबा बदामे डॉ.दिनेश वाघुंबरे

**• सल्लागार समिती •**

डॉ. राजन गवस डॉ. प्रकाश कुंभार डॉ. डी. ए. देसाई डॉ. अनिल गवळी

**• प्रकाशक •**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११

**मुद्रक**

देशमाने ऑफसेट,

औद्योगिक वसाहत, पलूस, (जि. सांगली) ४१६ ३१०, मो. ९९७०७००७५८

**मूल्य: ₹ ३००**

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. शिवकुमार सोनाळकर, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी देशमाने ऑफसेट, औद्योगिक वसाहत, पलूस येथे छापून अनुराज, ७/ब सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१५ ०११ येथे प्रकाशित केली. या प्रत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| स्वागताध्यक्षांचे मनोगत | | १ |
| संपादकीय | | ३ |
| अध्यक्षीय मनोगत... | डॉ. रघुनाथ अण्णा केंगार | ५ |
| स्त्रियांचे जीवन समृद्ध करणारी लोकगीते | साजिदा सरदार आरवाडे | १९ |
| आजरा तालुक्यातील लोककलांचे स्वरूप | डॉ. आनंद शामराव बल्लाळ | २१ |
| आदिवासी लोकगीतांतून व्यक्त होणारे नातेसंबंध | डॉ. कृष्णा भवारी | २४ |
| लावणीचे बदलते स्वरुप | डॉ. जयकुमार चंदनशिवे | २७ |
| गजीनृत्याचे प्रयोगवगजीनृत्याचे बदलते स्वरूप | प्रगती पाटील | २९ |
| मराठी नाटकातून आविष्कृत होणारी लोकसंस्कृती | स्मिता कोंडिबा कालभूषण | ३२ |
| 'मोहना–बटाव':एक दृष्टीक्षेप | डॉ. पांडुरंग ऐवळे | ३४ |
| महाराष्ट्रातील आदिवासींची लोकनृत्ये: भवाडा आणि दंडार | कु. प्रियांका अशोक कुंभार | ३८ |
| मराठी लोकसाहित्यातून परिष्कृत झालेले महाराष्ट्रीय जनजीवन | डॉ. गणपत काशिबा हराळे | ४० |
| दुर्मिळ होत चाललेल्या प्रायोगरूप लोककला: दिवटा, बहुरूपी आणि पिंगळा | डॉ. प्रियांका कुंभार | ४२ |
| स्त्रीगीतांतील विठ्ठल | डॉ. मानसी लाटकर | ४५ |
| मराठी ख्रिस्ती कीर्तनकारांची परंपरा | प्रा. अविनाश भोरे | ४९ |
| तमाशातील गणगौळण,लावणी आणि बतावणी | डॉ. संपतराव पार्लेकर | ५४ |

| | | |
|---|---|---|
| लोकनृत्योतून लोकसंस्कृआतीचा आविस्कार | डॉ. बाळासाहेब संतू चव्हाण | ५७ |
| आदिवासी जमातीच्या लोककलांचा सांस्कृतिक दृष्टीने अभ्यास | डॉ. डी. जे. दमामे | ६० |
| लोकसाहित्य व ललितसाहित्य यांचा अनुबंध | संतोषकुमार बाळकृष्ण डफळापूरकर | ६३ |
| लोककथेतील प्रयोगशील परिवर्तन | डॉ. युवराज देवाळे | ६५ |
| लोकसाहित्याची मौखिक परंपरा – लोककथा | शीतल शिवाजी धुमाळ | ६९ |
| खानदेशातील मातृदेवता : कानबाई | डॉ. रेश्मा दिवेकर | ७१ |
| तौलनिक लोकसंस्कृती अभ्यास : नवे अभ्यासक्षेत्र | डॉ. तातोबा बदामे | ७४ |
| लोकसंस्कृती आणि प्रयोगरूप लोककलाविचार | डॉ. शहाजी ज. पाटील | ७७ |
| लोकसंस्कृती आणि साहित्य सहसंबंध | डॉ. प्रकाश दुकळे | ८२ |
| लोकजागृती मधील भारूडाचे महत्त्व | श्रध्दा ज्ञानेश्वर धुमाळ | ८६ |
| लोकसाहित्यातील लोककथा | डॉ. दीपक गायकवाड | ८९ |
| सोलापूर जिल्ह्यातील लोककला | डॉ. अरुण कृष्णा शिंदे | ९२ |
| भारूडातील शैलीविचार | प्रा. (डॉ.) रमेश पांडुरंग पोळ | ९६ |
| लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या लोकगीतांचे योगदान | सुचिता सुभाष औंधकर | ९९ |
| 'गोंधळ'–एक विधिनाटय | डॉ.कांचन विजय नलावडे | १०२ |
| शाहूवाडी तालुक्यातील जाखडीफ लोकलेचे स्वरूप व परंपरा | प्रकाश नाईक | १०४ |
| तमाशा : बदलते स्वरूप आणि आव्हाने | डॉ. शिवराज काचे | १०७ |


ISSN No. 2319-6025

| | | |
|---|---|---|
| मराठी दळणगीतातील सामाजिक–नैतिक मूल्याविष्कार | डॉ. यादव सूर्यवंशी | ४०९ |
| पोतराजांचे विधिनाट्य आणि पोतराजाची गीते | डॉ.शरद गायकवाड | ४१३ |
| संत एकनाथांच्या भारुडांतून व्यक्त झालेली लोक संस्कृती | डॉ.आनंद वारके | ४१७ |
| आदिवासी भिल्लांच्या बोलीभाषिक लोककथा | डॉ. दीपककुमार वळवी | ४२० |
| लोकसंस्कृतीचा प्रयोगरूप आविष्कार: गोंधळ | माणिक नामदेव बनकर | ४२४ |
| लोकसाहित्य – संकल्पना, स्वरुप व व्याप्ती एक दृष्टिक्षेप | सुवर्णा रामचंद्र शिंगाडे | ४२८ |
| लोकसाहित्या प्रयोग आविष्कार : तमाशा | डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे | ४३१ |
| लोकसंस्कृतीतील स्त्रियांची समृद्ध लोकगीतगंगा | दादासाहेब ईश्वर गायकवाड | ४३५ |
| लोकसाहित्याचे संशोधन : स्वरूप व व्याप्ती | डॉ. डी. आर. गायकवाड | ४३९ |
| लोक नाट्य तमाशा : लोकल ते ग्लोबल | गुंडोपंत पाटील | ४४३ |
| तमाशा कलावंतांचे सामाजिक जीवन आणि संस्कृती | डॉ. सुनील चंदनशिवे | ४४८ |
| लोकसंस्कृतीचे उपासक–वाघ्या–मुरळी | डॉ.प्रशांत गायकवाड | ४५१ |
| तमाशाचे बदलते स्वरूप | डॉ. नितीश पांडूरंग सावंत | ४५५ |
| लोकसाहित्य एक कला प्रकार : उखाणा | डॉ. शर्मिला घाटगे | ४५९ |
| लोककथेची निवेदन तंत्रे | डॉ. सुरेश बा. शिंदे | ४६२ |


ISSN No. 2319-6025

# तमाशाचे बदलते स्वरूप

**डॉ. नितीश पांडूरंग सावंत**
जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर

तमाशाचा उदय नेमका केव्हा आणि कोणत्या परिस्थितीत झाला, या विषयी विद्वानांत मतभेद असले तरीही तमाशाला परिणत स्वरूप लाभले ते पेशवाईतच. विशेषत: उत्तर पेशवाईत सवाई माधवराव व दुसरा बाजीराव यांच्या कारकिर्दीत तमासगीर शाहीरांना राजाश्रय लाभल्यामुळे तमाशाचा विशेष उत्कर्ष झाला. '' 'तमाशा' हा शब्द मुसलमानांच्या संपर्काने रूढ झाला. शिवाजी राजांनी आपले सावत्र भाऊ व्यंकोजीराजे यांना लिहिलेल्या एका पत्रात 'आम्हासही पराक्रमाचे तमाशे दाखवा' असे लिहिले आहे. यावरून 'तमाशा' म्हणजे काहीतरी भव्यदिव्य करून दाखविणे असा अर्थ संभवतो. तसेच काही करून दाखवून इतरांच्या मनात खुषी निर्माण करणे असाही ध्वन्यर्थ त्यातून निघू शकतो. लोकांचे मनोरंजन करणे आणि त्यांना खूष करणे हा उद्देशच 'तमाशा'च्या मुळाशी आहे.'' १ तमाशा हा शब्द फारशी असून मुसलमानांबरोबर तो महाराष्ट्रात आला. मराठीत विशिष्ट रंगभूमीसाठी ही संज्ञा वापरण्यात येत असली तरी महाराष्ट्रात कळसुत्री बाहुल्यांचे खेळ, दशावताराचे खेळ, निरनिराळी सोंगे आणून केलेले खेळ, कसरतीचे खेळ हे प्रकार आधीपासूनच रूढ होते. आणि अशा खेळांसाठीच परकीयांनी 'तमाशा' हा शब्द वापरला. तेव्हापासून तो महाराष्ट्रातील लोकांनी स्वीकारला असावा. 'महाराष्ट्रात जे अनेक प्रयोगरूप कला प्रकार आहेत त्यापैकी तमाशा हा अतिशय महत्त्वपूर्ण आणि बहुजन समाजात प्रिय असणारा कलाप्रकार आहे. तमाशा गेल्या तीन -साडेतिनशे वर्षांपासून जनसामान्यांचे रंजन करीत आहेत. गोंधळ, वाघ्या मुरळीचे भेदिकफड, बुहरूपी इत्यादी प्रयोगरूप कलाप्रकाराकडून काही तत्त्वे स्वीकारून त्यात काही नव्या गोष्टींची भर घालून आणि स्वीकारलेल्या गोष्टींवर स्वत:चा ठसा उमटवून तमाशाने आपले रूप सिद्ध केले.'२

तमाशा हा रंजन प्रकार केव्हा सुरू झाला हे जरी निश्चयात्मक रीतीने सांगता येत नसले तरी त्याची जडण घडण कशी झाली हे सांगता येते. गणेश रंगनाथ दंडवते यांच्या मतानुसार तमाशाची परंपरा 'गोंधळ' या विधिनाट्यातून विकसित झाली. डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या मते, गोंधळ्यांनी जेव्हा तमाशा स्वीकारला, तेव्हा गोंधळ संस्थेतील नाट्यात्मकतेचा उपयोग करून घेतला. गोंधळातील विनोदी गीते व विनोदी प्रश्न विचारून हास्यरस निर्माण करणारे एक पात्र याचाही तमाशाच्या घडणीत वाटा आहे. गद्य-पद्यात्मक संवाद, कवन चालू असतानाच करावयाचा हास्यविनोद हे विशेष गोंधळातूनच आले आहेत. पौराणिक विषयांवरील लावण्या, त्याचप्रमाणे तीर्थक्षेत्रांच्या वर्णनपर लावण्या या शाहीरी रचनेचे मूळही गोंधळाच्या गीतात आढळते. तमाशाच्या जडण-घडणीत गोंधळाइतकाच वाघ्या-मुरळीच्या जागरणाचाही वाटा आहे. गोंधळ आणि जागरण या विधिनाट्यातील गानसरणी, रचना प्रकार त्याचप्रमाणे नाट्य सादर करण्याची पद्धती या बाबींचा स्वीकार करून शाहीरांनी तमाशाची रंगभूमी सिद्ध केली

आहे असे म्हणता येईल. तमाशा हा शुद्ध रंजनप्रधान रंगभुमीचा प्रकार आहे. काही शाहीरांनी तमाशाच्या रंगभूमीवर लोकानुरंजन करता करता परमेश्वराचे संकीर्तन केले असले तरी काहींनी अशी तडजोड करण्याचे नाकारल्याचे स्पष्ट दिसते. रामजोशी, प्रभाकर, होनाजी इ. लावणीकारांनी बऱ्याच पौराणिक लावण्या लिहिल्या आहेत. आशय पौराणिक असला तरी मानवी शृंगाराचे भडक वर्णन राधा–कृष्ण विलासवर्णनाच्या निमित्ताने त्यांनी केले आहे. ''लावणी हा अस्सल मराठी मनाचा हुंकार होय. लावणी हा अस्सल मराठी ढंगाचा बाजाचा काव्यप्रकार आहे. लावणी ही स्त्रियांनीच म्हणावयाची, शृंगाराविष्कारासाठी लावणी इहवादी, लौकीक जीवनवादी आहे. लावणी प्रवृत्तीपर असून ती साक्षात जीवनासक्ती आहे. शृंगार ही तिची मूळ प्रवृत्ती होय. सर्व मराठी गीतांची लावणी ही सम्राज्ञी होय. 'तमाशा' कला ही अधिक लोकाभिमुख होय. तमाशाचा प्रयोग उघड्या मैदानावर होतो. तमाशा बहुजन समाजाकरीता मोफत प्रवेश सर्व जातीधर्मीयांना मुक्त. तमाशातील गणांपासून वगापर्यंत सर्व प्रकार अस्सल ग्रामीण मराठीतून, तमाशातील शृंगार, लौकीक शृंगाराचे दर्शन घडविणारा असतो. तमाशाकला ही लौकिक पातळीवरील लोककला होय. ''तमाशातील कलावंत हे लोककलावंत असून बहुजन समाजातून आलेले असतात. तमाशाकला ही लोककला असल्याने आमजनतेच्या मनाला भिडणारी असते.''३

तमाशा या लोकरंगकलेचे निरनिराळे प्रकार आहेत. सादरीकरणाच्या स्वरूपावरून, त्यातील गान प्रकारावरून तसेच प्रदेशपरत्वे त्यात निर्माण झालेल्या वैशिष्ट्यांच्या आधारावर हे प्रकार घडलेले आहेत.

१) बारीचा तमाशा

२) ढोलकीचा तमाशा

बारीचा तमाशा – बारीचा तमाशा हा बैठकीतील असतो. त्यात कलावंतांनी या नृत्याभिनयासह किंवा एके ठिकाणी बसून आंगिक सात्विक अभिनयाच्या माध्यमातून लावणी सादर करतात. बारीचा तमाशा हा बैठकीतील असतो. त्यात कलावंतानी या नृत्याभिनयासह किंवा एके ठिकाणी बसून अंगीक सात्विक अभिनयाच्या माध्यमातून लावणी सादर केली जाते. तमाशातील गण, गौळण हे भाग झाल्यावर लावणी सादर केली जाते. विविध प्रकारच्या लावण्या नाचून गाऊन वाद्यसंगीतासह तमाशात सादर केल्या जातात. तमाशात म्हटल्या जाणाऱ्या या लावणीला फडाची लावणी असे म्हटले जाते. समूह मनाचे रंजन करण्यासाठी लावणीचा जन्म झाला असावा. लावण्यांमधून तत्कालीन समाजजीवनाचे दर्शन घडते. राम जोशींच्या दुष्काळावरच्या लावण्या, अनंतफंदींच्या बदलत्या काळातील लावण्या, होळकर दंग्याचे वर्णन यासारख्या लावण्यांतून तत्कालीन समाजस्थितीचे चित्रण येते. या शिवाय जेवणावळी, सामाजिक चालीरीती, नीतीमत्ता, पोशाख, अलंकार, खेळ, कुटुंब व्यवस्था, समजूती, संकेत यांची वर्णने येतात.

ढोलकीचा तमाशा – या तमाशामध्ये स्वतंत्र रंगमंचाची योजना असते. प्रदेशपरत्वे प्रकारभेद असतात. विदर्भात 'खडी गंमत' असा एक तमाशाचा वैशिष्ठ्यपूर्ण प्रकार दिसतो. तमाशाच्या जडण–घडणीसंबंधी नामदेव व्हटकरांनी त्यांच्या 'तमाशा' या


ISSN No. 2319-6025

पुस्तकात पुढील अभिप्राय दिलेले आहेत ते म्हणतात, ''नंदिवाल्याचा ढोल आणि कोल्हाटणीची ढोलकी यांच्या मिश्रणाने तमाशाची ढोलकी झाली. डौऱ्याचे पद म्हणण्याचे तुणतुणे त्याने घेतले. झांज भजनाच्या टाळाची घेतली. लग्नातल्या, वऱ्हाडकऱ्यांसमोर गोंधळात तो जात असे. तसेच त्याने फौजी समुहांसमोर ताफा उभा ठेवण्याची पद्धती भारूडातून घेतली. वाघ्या-मुरळीची हाळ घालण्याची पध्दती स्वीकारली. कडक बोलणारेकडे भेदिकांतून घेतले. हे कार्यक्रम उघड्या मैदानावर होत होते. त्या सर्वांचे मिळून झाले ता तमाशाचा प्रकाराचा खेळ झाला.''४ निरनिराळ्या आदीवासी जमातीमध्ये तमाशाचे विविध प्रकार रूढ आहेत. त्यांच्यात जमातीपरत्वे काही निराळेपण आढळत असले तरी स्थूलपणे त्यांच्या स्वरूपात साम्य आढळते. जसे की 'ठाकरी गंमत' 'कोकणी तमाशा' भिल्लांच्या 'सोंगाड्या'चे ही स्वरूप तमाशासारखेच असते. मराठवाड्यातील अनेक गावात विशेषत: जेथे कोल्हाटणीची घरे आहेत तेथे लग्नविधीचा एक भाग म्हणून कोल्हाटणीचा तमाशा करण्याची पध्दत आहे. जमलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी हा तमाशा केला जातो. तमाशातील सादरीकरणाची सगळी मदार सोंगाड्यावर असते. सोंगाड्या हे पात्र कोणत्याही भूमिकेत, कोणत्याही स्वरूपाच्या कथेत वावरू शकते. विनोद निर्मिती हे त्याचे खरे काम असते. तमाशातील एक महत्त्वाचे पात्र म्हणजे मावशी. मथुरेच्या बाजाराला निघालेल्या गवळणीत एक प्रौढ अनुभवी गवळण असते. तीच मावशी. उत्तर पेशवाईत तमाशात नाच्या पोऱ्या असे. आता नाची असते. सोंगाड्या हाच मावशीचे काम करतो. पुरूष वेशातील सोंगाड्या केवळ पदराने मावशीचे पात्र वठवितो व धमाल उडवितो. मथुरेला बाजाराला जाताना आपल्याबरोबर एखादी प्रौढ व्यक्ती पाहिजे म्हणून त्या मावशीला बरोबर घेतात आणि त्यांचा संवाद सुरू होतो.

गवळणी : मावशे ए मावशे

मावशी : आले आले...

गवळणी : काय करीत होतीस गं ?

मावशी : अगं नवऱ्याला पाजीत होते.

गवळण : आँ ! नवऱ्याला पाजीत होतीस ?

मावशी : तुम्ही वेड्या आहात का खुळ्या? एकुलता एक नवरा माझा, त्यातून तो दुखणेकरी. त्याला औषधपाणी नको का द्यायला! औषध पाजीत होते. तेवढ्यात मला तुम्ही बोलावलं. काही वेळेला औषधाऐवजी मावशी 'नवऱ्याला दूध पाजीत होते' असं म्हणते. मग गवळणी विचारतात काय? दूध पाजीत होते. मग मावशी गवळणींना पटवून सांगते की गाई म्हशी कुणाच्या? तुझ्या. मग दुध कुणाचं? माझंच. तर मी दुध पाजीत होते. अशा प्रकारच्या संवादातून मावशी विनोदनिर्मिती करते.

तमाशाचे मुख्य अंग आखानाच्या किंवा वगाच्या सादरीकरणात असते. ''गण गौळण झाल्यानंतर आख्यानापूर्वी एक विशिष्ट संवाद येतो. यालाच बतावणी असे म्हणतात.''५ यामध्ये परंपरेने चालत आलेल्या एखाद्या विनोदी कथेचे किंवा चुटक्यांचे सादरीकरण असते. अतिशयोक्ती, विसंगती किंवा एखाद्या धुर्ताने केलेली भोळ्या भाबड्यांची फजिती असे त्याचे स्वरूप असते. बतावणीत आपल्या भोवती घडणाऱ्या



ISSN No. 2319-6025

घटनांच्या संबंधी उपरोधिक टीका असते. तमाशात दौलत जादा हा प्रकारदेखील सुरू झाला. दौलतजादा म्हणजे पैसे देऊन आवडीची लावणी किंवा गाणे म्हणायला लावणे. ते गाणे पूर्ण होऊ न देता दुसऱ्याने त्याच्यापेक्षा अधिक पैसे देऊन आपल्या आवडीचे गाणे म्हणायला लावणे हा तो प्रकार होय. याला गाणे तोडणे म्हणतात. तमाशात गण, गौळण, बतावणी यानंतर लावणी गाण्याची प्रथा होती. या लावण्या पौराणिक त्याचप्रमाणे शृंगारिक असायचा. तमाशातल्या लावणीची खरी लज्जत सादरीकरणाच्या सवाल-जबाबात असायची. 'मोहनाबटाव' हा मराठीतील उमा बाबू मांग याने लिहिलेला पहिला वग होय.

तमाशा विषयी अनेक अपसमज निर्माण झाले होते व अजुनही त्याचे पूर्णपणे निराकरण झाले असे नाही. तमाशा अश्लील असतो. त्यात ग्राम्यता आढळते. त्यात काम करणाऱ्या स्त्रिया धंदेवाईक असतात. अशी खरी खोटी कारणे या अपसमजामागे होती. अजुनही आहेत. मात्र एका गोष्टीची खंत आहे. ती म्हणजे, ''तमाशा या लोककला प्रकाराची प्रेक्षकश्रेणी एकांगी आहे. तमाशाला स्त्रीप्रेक्षक वर्ग अजिबात मिळत नाही. तमाशात मर्यादांचे उल्लंघन करणारी अश्लिलता असते. भाषा क्वचित चावट असते आणि अजूनही भारतीय स्त्री पारंपरिक संस्कारातून पूर्णपणे बाहेर पडलेली नाही. म्हणूनच स्त्रीप्रेक्षक वर्ग या कला प्रकाराकडे वळत नसावा.''६
परंपरेने चालत आलेले तमाशाचे स्वरूप अलिकडच्या काळात झपाट्याने बदलत चालले आहे.

औद्योगिकरणामुळे शहराच्या बदललेल्या स्वरूपाचा परिणाम तमाशावर होत आहे. चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन या प्रसारमाध्यमांतून होणाऱ्या रंजनप्रधान कार्यक्रमाचा त्यावर प्रभाव पडत आहे. आताच्या तमाशाचे स्वरूप ऑर्केस्ट्रासारखे बनत आहे. गण, गौळण जरी शिल्लक राहिली असतली तरी बतावणी रंगबाजी यांचे स्वरूप पार बदलले असल्याचे दिसते. 'बतावणी' तर अभावानेच दिसते. रंगबाजीत लावणी ऐवजी सिनेमाची गाणी म्हटली जातात. त्याचे स्वरूप जिवंत चित्रहारासारखे होत आहे. भव्य रंगमंच, कपडेपट, लाईटस्, डीनर अशा अनेक तांत्रिक बाबी तमाशात आल्या आहेत. तमाशात आता दौलतजादा, रंगबाजी, लावणी तोडणे प्रकार चालत नाही त. तर तथाकथीत हिट हिंदी गरण्याची फर्माईश होते. प्रेक्षकांतून गाण्याच्या चिठ्ठ्या स्टेजवर जातात. आणि मागणी तसा पुरवठा म्हणून तमाशा कलावंताना धांगडधिंगा डान्स करावा लागतो. अर्थात ही गाणी ऐकणाराही प्रेक्षकांत विशिष्ठ वर्ग आहे. या वर्गाची भरपूर करमणूक झाल्यावर मग 'तमाशा' आपल्या मूळ स्वरूपाकडे वळतो. आजकालचा तमाशा हिंदी-मराठी तोंडावळ्यांचा तमाशा आहे. अभिरुचीत बदल त्यानुसार सादरीकरण त्यामुळे पुन्हा अभिरुचीवर परिणाम असे दुष्ट चक्र चालत आहे. त्यात तमाशाचे पारंपरिक, प्रवाही देशी स्वरूप हळूहळू लूप्त होत आहे. नाटक आणि सिनेमा या दोन्ही मिडियाचा एकत्र अनुभव रंगभूमीवरून यावा असे रसिकाला का वाटू लागले असावे. हा खरोखरीच संशोधनाचा विषय आहे.


ISSN No. 2319-6025